# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मूर्तीकार / साठवणूकदार यांच्या अर्जासंबंधी आवश्यक सूचना.

- अर्जदारास आपल्या अर्जासह स्वतःच्या आधार कार्डाची प्रत स्वयंसाक्षांकीत करुन जोडावी लागेल.
- ज्या मूर्तीकारांनी यापूर्वी विभाग कार्यालयात असंगणकीय पद्धतीने (ऑफलाईन) अर्ज केला असेल त्यांनी त्याची प्रत संगणकीय अर्जासह सादर करावी.
- शाडू / पर्यावरणपूरक साहित्याने मूर्ती घडविणाऱ्या मूर्तीकारास यावर्षी प्रायोगिक तत्वावर महापालिकेतर्फे मर्यादित कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याची यादी अर्जदार संबंधित विभागाचे नाव निवडेल त्यावेळी त्याच्यासमोर संगणकीय प्रणालीमध्ये उपलब्ध होईल. तथापि, महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन द्यावयाच्या जागा एखाद्या विभाग कार्यालयात उपलब्ध नसतील तर अशा विभाग कार्यालयात अर्ज करु इच्छिणारे मूर्तीकार संबंधित परिमंडळातील विभागात जागेसाठी अर्ज करु शकतात. सदर अर्ज प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विभाग कार्यालयामार्फत कार्यन्वित केले जातील. अपूर्ण / अयोग्य अर्ज बाद होतील.
- महापालिकेतर्फे दिल्या जाणाऱ्या जागेचे आकारमान सर्वसाधारणपणे एका अर्जदारास जास्तीत जास्त 100 चौ. मी. एवढे असेल किंवा एखाद्या विभागात कमी जागा उपलब्ध असल्यास, अर्जदारास उपलब्धतेनुसार जागा प्राप्त होईल.
- एखाद्या विभागात 100 चौ. मी. पेक्षा जास्त जागा उपलब्ध असल्यास, सर्वसाधारणपणे प्रत्येकी जास्तीत जास्त 100 चौ. मी. अशा प्रमाणात एकापेक्षा जास्त मूर्तीकारांस एकाच जागेचे वाटप केले जाईल.
- एखाद्या प्रसंगी तंटा उद्भवल्यास त्यावर मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल.